महाराष्ट्र शासन

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय.

विषय:- मळी मद्यार्क / मद्य यांचे वाहतूक अथवा
निर्यात पासाचे मुदती बाबत.

वाचा :- १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक बीपीए/ ट्रान्सपोर्ट पास / चार, दि.१८.९.१९९५

२) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक बीपीए ११९५ /ट्रान्सपोर्ट पास /चार, दि.१८.११.१९९५.

३) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक बीपीए ११९५ / ट्रान्सपोर्ट पास / चार, दि.५.१.१९९६.

४) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक बीपीए ११९५ / ट्रान्सपोर्ट पास/ चार, दि.१.४.२००२.

## परिपत्रक

क्रमांक - बीपीए २००२ / ट्रान्सपोर्ट पास / चार                मुंबई        ८ ऑक्टोबर २००२

या कार्यालयाच्या उपरोक्त परिपत्रकान्वये मळी,मद्यार्क व मद्य यांच्य वहातुक किंवा निर्यात पासाची मुदत किती असावी हे विहीत करण्यात आले आहे. त्यामध्ये सुधारणा करुन असे आदेशित करण्यात येते कि, जिल्ह्यातल्या जिल्ह्यात वहातुक पासाची मुदत जो पास दिल्यापासुन ३० तासात ठरली होती त्याऐवजी १२ तासांची करण्यात येत आहे. तसेच वहातुकीच्या ठिकाणावरुन ५०० कि.मी. पर्यंत ४ दिवसांची मुदत देण्यात आली होती. त्याऐवजी २५० कि.मी.ला १ दिवसाची मुदत करण्यात येत आहे. परिणामी वहातूक किंवा निर्यात पासाची मुदत पुढील प्रमाणे राहील.

१) जिल्ह्यातल्या जिल्ह्यात वहातूक पास दिल्याचा दिवस फक्त ( ठाणे ते मुंबई करिता हीच वहातुकीची मुदत लागू पडेल )

२) वहातुकीच्या ठिकाणावरुन २५० कि.मी. पर्यंत १ दिवस ( Departuer दिवस वगळून ) .

३) २५० कि.मी. च्या पुढे प्रत्येक २५० कि.मी. ला १ दिवस अधिक ( Departuer दिवस वगळून) व अधिक दुसऱ्या दिवस पर्यंत मुदत वाढ देण्यात येत आहे.

पास देताना पास दिल्याची वेळ व वहातुकीचा मार्ग स्पष्ट लिहिण्यात यावा.

तसेच यापुढे मळी / मद्यार्क / मद्य निर्मिती घटकाने विक्री संबंधीचे वहातुक पास हस्ताक्षरात न लिहिता संगणकावर टंकलेखित करावेत. या सूचना देशी / विदेशी मद्याचे घाऊक अनुज्ञप्तीधारकास लागू राहतील.

या परिपत्रकाची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी.

( ए.रामकृष्ण )
आयुक्त

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी

२) या कार्यालयातील सर्व उप आयुक्त व सह आयुक्त

३) सर्व विभागीय उप आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क

४) सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क (प्रत्येकी ३ प्रती )

५) सर्व प्रभारी अधिकारी, आय,डिएस-१,पीएलएल,सीएल-१,बीआरएल,एफएल-१ व सीएल-२ अनुज्ञप्ती धारक ( मार्फत अधीक्षक )

६) या कार्यालयातील अभिलेख कक्ष पाच प्रती